# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# देवाकडून पाठविलेला मनुष्य

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

60 गोष्टींतील 37 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

एके दिवशी, देवाच्या मंदिरात, जखऱ्या नावाचा एक वृध्द् याजक धूप जाळत होता. मंदिराच्या बाहेर लोक प्रार्थना करीत होते. अचानक जखऱ्या अस्वस्थ व भयभीत झाला तो हादरला.



1

एक देवदुत तेथे आला होता. तो त्याला म्हणाला, "भिऊ नको, देवाने मला येथे पाठविले आहे. तुझ्या पत्नीला मुलगा होईल. त्याचे नाव योहान असे ठेव. तो जन्मापासूनच पवित्र आत्म्याने भरलेला असेल. तो पुष्कळांस परमेश्वराकडे वळवील."



2


बाहेरील लोक गोंधळून त्याला म्हणाले, "जखऱ्या तूं आमच्याशी बोल." देवाच्या संदेशावर जखऱ्याने विश्वास केला नसल्यामुळे बाळाच्या जन्मापर्यंत तू बोलू शकणार नाही असे देवाचा दुत गॅब्रीएल याने त्याला सांगितले आहे, हे त्या लोकांना माहित नव्हते.
3


आता त्याची पत्नी फारच म्हातारी झाली आहे; तर मुल कसे होईल असे जखऱ्याला वाटत होते.
4


घरी गेल्यावर, देवदुताने त्याला जे काही सांगितले होते ते सर्व त्याने लिहून सांगितले. त्याची पत्नी अलीशिबा अचंबित झाली. लेकरासाठी ते सदोदीत प्रार्थना करित होते. असे होणे आता शक्य होते का?
5


मुल जन्माला येणार हे अलीशिबेला लवकरच कळले. तिने देवाची स्तुति केली. एके दिवशी, तिची चुलती मरिया हिने तिची भेट घेतली. मरियेला सुध्दा दिवस गेले होते, ती देखिल लवकरच बाळाला जन्म देणार होती.
6


जेंव्हा मरिया अलीशिबेकडे येऊन पोहोचली तेंव्हा तिच्या पोटात तिच्या बाळाने उडी मारल्याचे तिला जाणवले. अलीशिबा पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाली. मरियेच्या पोटातील बाळ म्हणजे प्रभू येशू ख्रिस्त आहे हे तिला माहित होते. त्या दोघींनी मिळून देवाची आनंदाने स्तुति केली.
7


देवाने अभिवचन दिल्याप्रमाणे अलीशिबेच्या बाळाचा जन्म झाला. "त्याच्या बापाच्या नावावरुन याचे नाव देखिल जखऱ्याच ठेवा" असे इतर याजक म्हणत होते. देवाने केलेली आज्ञा जखऱ्याच्या लक्षात होती. "नाही, याचे नाव योहान असे आहे" हे शब्द जेंव्हा त्याने पाटीवर लिहिले, तेंव्हा तो पुन्हा बोलू लागला. मग तो देवाचा धन्यवाद करु लागला.
8


जेंव्हा योहान मोठा झाला, तेंव्हा तो देवाचा महान सेवक एलिया सारखा बनला. योहानाने लोकांना सांगितले की, मसिहा लवकरच त्यांना आशिर्वाद देण्यासाठी येणार आहे.
9


यहुदी पुढाऱ्यांना योहान आवडत नसे कारण तो त्यांना "पश्चाताप करा ! पाप करणे थांबवा" असे म्हणत असे. त्यांना त्यांच्या पापाविषयी ऐकायला नको होते.
10


इतर लोक त्याला बाप्तिस्मा करणारा योहान असे म्हणत, कारण लोकांना त्यांच्या पापाचा पश्चात्ताप झाला आहे हे दर्शविण्यासाठी तो त्यांना पाण्यात बुडवून बाहेर काढीत असे. एके दिवशी, बाप्तिस्मा घेण्यासाठी येशू योहानाकडे आला. योहानाने स्वतः चा बचाव करित म्हटले, "मी तुमच्या हातुन बाप्तिस्मा घ्यायला हवा." परंतू येशूने त्याला म्हटले, "आता हे असे होऊ दे." आणि योहानाने त्याचा बाप्तिस्मा केला.
11


येशूचा बाप्तिस्मा झाल्यानंतर, आकाशातून कबुतराच्या रुपात पवित्र आत्मा येशूवर उतरतांना योहानाने पाहिला. हे देवाचे चिन्ह होते. येशू हा देवाचा पुत्र आहे हे योहानाला माहित होते. जगाचे पाप नाहीसे करणारा देवाचा कोकरा असे योहानाने येशूला संबोधले आहे.
12


पुष्कळ लोकांना योहानाने देवाकडे आणले होते. परंतू दुष्ट राजा हेरोद याने योहानाला तुरुंगात टाकले. "तुझ्या भावाची पत्नी हेरोदिया हिला तुझी पत्नी अशी करुन घेणे हे तुझे पाप आहे. असे योहानाने हेरोद राजाला सांगितले होते. हे खरे आहे असे हेरोदाला माहित होते.
13


योहान हा नीतिमान व पवित्र असा देवाचा सेवक आहे हे हेरोदाला माहित होते. परंतू त्याला पाप करण्याचे थांबविण्याची ईच्छा नव्हती. आणि योहान जरी तुरुंगात असला तरी पापाविरुध्द् संदेश देण्याचे तो थांबवणार नव्हता.
14













देवाकडून पाठविलेला मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मार्क ६, लूक १, ३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!